# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००११५२**

**अपिलार्थी श्री. हर्षल खैरनार**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता-१ व २ (शहर)**
मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, मुंबई, कार्यकारी अभियंता (शहर) यांचे कार्यालय,
रू.नं. ५३९, ४ था मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर,
वांद्रे (पू), मुंबई-५१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (शहर)**
मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, मुंबई, कार्यकारी अभियंता (शहर) यांचे कार्यालय,
रू.नं. ५३९, ४ था मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर,
वांद्रे (पू), मुंबई-५१

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १३.०८.२०२५</u>**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १८.१२.२०२३ | - | २५.०१.२०२४ | ०१.०४.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २६.०४.२०२४ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित केलेले नाहीत असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलार्थी यांनी दि. १८.१२.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती- "Inspection of all records related to Administrative Approval dated 14.11.2022 and Executive Engineer (City) letter dated 12.05.2023 The letter emcompasses a total of 23 works."

जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिलेले नाही म्हणून अपिलार्थींनी दि. २५.०१.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, विद्यमान व तत्कालिन जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. १२.०८.२०२५ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी दि. १२.०३.२०२४ रोजी सुनावणी घेऊन दि. ०१.०४.२०२४ रोजी आदेश पारित केलेले आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी

..२/-

आदेशात नमुद केले होते की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने उपलब्ध दस्ताऐवज अपिलार्थींना निरीक्षणाकरीता उपलब्ध करुन द्यावे व प्रत्येक अर्जातील केवळ एका विषयाची अपिलार्थी मागणी करतील त्या विषयाची माहिती निशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असेही सादर केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशाप्रमाणे अपिलार्थींना एका विषयाची माहिती निशुल्क उपलब्ध करुन देण्यात येईल.

अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतर जन माहिती अधिकारी यांना अनेक ईमेलव्दारे विनंती केली तरीही निरीक्षण व माहिती देण्यात आलेली नाही.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

## आदेश

**१) विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने उपलब्ध दस्ताऐवज अपिलार्थींना आदेशप्राप्तीच्या १५ दिवसांत निरीक्षणाकरीता उपलब्ध करुन द्यावे व त्यापैकी अपिलार्थी ज्या एका विषयाची मागणी करतील त्याची माहिती अपिलार्थींना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(६) अन्वये निशुल्क उपलब्ध करुन द्यावी.**

**२) श्री. अतुल देसाई, तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.१८.१२.२०२३ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरून विहीत मुदतीत तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतरही माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरूध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या २० (१) अन्वये रू. २५,०००/- ची शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा ३० दिवसांत त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरून शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

**३) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : १४.०८.२०२५**

State Information Commission Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००११५२**

**अपिलार्थी श्री. हर्षल खैरनार**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता- १ व २ (शहर)**
मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, रुम नं. ५३९, ४ था मजला,
गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पू), मुंबई-५१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (शहर)**
मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, रुम नं. ५३९, ४ था मजला,
गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पू), मुंबई-५१

**(In continuation of order dtd १४.०८.२०२५)**

उक्त प्रकरणी आयोगाने दि. १४.०८.२०२५ रोजी पुढीलप्रमाणे आदेश दिले होते:-

१) *"विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने उपलब्ध दस्ताऐवज अपिलार्थींना आदेशप्राप्तीच्या १५ दिवसांत निरीक्षणाकरीता उपलब्ध करुन द्यावे व त्यापैकी अपिलार्थी ज्या एका विषयाची मागणी करतील त्याची माहिती अपिलार्थींना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(६) अन्वये निशुल्क उपलब्ध करुन द्यावी.*

२) *श्री. अतुल देसाई, तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.१८.१२.२०२३ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरून विहीत मुदतीत तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतरही माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरूध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या २० (१) अन्वये रू. २५,०००/- ची शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा ३० दिवसांत त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरून शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.*

३) *अपील निकाली काढण्यात येत आहे."*

सदर प्रकरणी आयोगाचे आदेश दि. १४.०८.२०२५ रोजीच्या अनुषंगाने श्री. अतुल देसाई, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता- २, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, मुंबई यांनी दि.१८.०९.२०२५ रोजी खालीलप्रमाणे खुलासा आयोगास सादर केलेला आहे:-

*"कार्यालयामार्फत अर्जदारास आवश्यक ती माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तथापि, संबंधित प्रकरणाशी निगडित काही नोंदी व कागदपत्रे कार्यालयीन अभिलेखांत तात्काळ उपलब्ध होत नसल्यामुळे ती शोधून काढण्यासाठी वेळ लागला. तसेच या कालावधीमध्ये कार्यकारी अभियंता १ शहर कार्यालयात या प्रकारचे माहिती अधिकाराअंतर्गत खूप अर्ज आले होते.*

*सदर विलंब हा कोणत्याही प्रकारे जाणूनबुजून किंवा हेतुपुरस्सर झालेला नाही. तसेच माहिती लपविण्याचा अथवा अर्जदारास त्रास देण्याचा आमचा कोणताही हेतू नव्हता.*

..२/-

*त्या अनुषंगाने आपणास विनंती आहे की आम्हाला सदर नोंदी शोधून काढण्यासाठी व अर्जदारास संपूर्ण माहिती उपलब्ध करून देण्यासाठी संधी द्यावी. तसेच माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) नुसार दंडात्मक कारवाई टाळावी, ही नम्र विनंती. कृपया या बाबीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून न्याय द्यावा."*

श्री. अतुल देसाई, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता- २, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, मुंबई यांनी सादर केलेल्या खुलाशाचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती दोन भिन्न भिन्न शासन निर्णयांमध्ये २३ वेगवेगळ्या कामांविषयी होती. या कारणामुळे जन माहिती अधिकारी यांचा खुलासा मान्य करण्यात येत आहे. सबब आदेश पुढील आदेश देत आहे:

## आदेश

**जन माहिती अधिकारी यांचा खुलासा मान्य करुन दि. १४.०५.२०२५ रोजीच्या आयोगाच्या आदेशानुसार प्रस्तावित शास्तीची कार्यवाही रद्द करण्यात येत आहे. सदर अपील अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : २९.०५.२०२६**

State Information Commission
Greater Mumbai

प्रदीप व्यास
29-5-2026

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**